Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date 05 January 2026

Time 11.00 to 11.05 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक ०५ जानेवारी २०२६ सकाळी ११.०० वाजता**

****

संरक्षणमंत्री राजनाथ सिंग यांच्या हस्ते गोव्यात वास्को इथं भारतीय तटरक्षक दलाच्या पहिल्यावहिल्या प्रदूषण नियंत्रण जहाज ‘समुद्र प्रताप’ चं आज जलावतरण होत आहे. समुद्रात होणारी तेलगळती वेळीच ओळखून संभाव्य प्रदूषण रोखण्यासाठी हे जहाज अत्याधुनिक प्रणालीने सज्ज आहे. तेलगळती झाल्यास दूषित पाण्यातून तेल वेगळं करणं, तसंच प्रदूषक घटकांचं विश्लेषण करण्याची क्षमता या जहाजात आहे. ११४ पूर्णांक पाच मीटर लांबी, १६ पूर्णांक पाच मीटर रुंदी आणि चार हजार टनांहून अधिक वजन असलेलं हे जहाज आधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज असून, त्याच्या निर्मितीत ६० टक्क्यांपेक्षा अधिक स्वदेशी सामग्रीचा वापर करण्यात आला आहे. या जहाजामुळे भारतीय तटरक्षक दलाच्या प्रदूषण प्रतिसाद, अग्निशमन आणि सागरी सुरक्षेच्या क्षमतांमध्ये मोठी वाढ होणार असून, आत्मनिर्भर भारत आणि मेक इन इंडिया उपक्रमाला यामुळे आणखी बळ मिळणार आहे.

****

देशभरात आज राष्ट्रीय पक्षी दिन साजरा केला जात आहे. पक्षी हे केवळ निसर्गाचं सौंदर्य वाढवणारे घटक नसून, ते संपूर्ण परिसंस्थेचा अविभाज्य भाग आहेत, याची जाणीव करून देण्यासाठी हा दिवस दरवर्षी पाळला जातो. पक्ष्यांचं संरक्षण करणं, त्यांच्या नैसर्गिक अधिवासाचं जतन करणं आणि निसर्गातील समतोल कायम राखणं, हा या दिवसाचा मुख्य उद्देश आहे. राष्ट्रीय पक्षी दिनानिमित्त नागरिकांमध्ये पक्षी संवर्धनाबाबत जनजागृती निर्माण करण्यावर विशेष भर दिला जातो. निसर्ग टिकवण्यासाठी आणि पुढील पिढीसाठी समृद्ध पर्यावरण राखण्यासाठी पक्षी संरक्षण ही आपली सामूहिक जबाबदारी असल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

राज्यात २९ महापालिकांच्या निवडणुकीच्या प्रचारानं गती घेतली आहे. विविध पक्षांच्या उमेदवारांकडून वैयक्तिक भेटीगाठींद्वारे तसंच प्रचार सभांद्वारे प्रचार सुरू झाला आहे. अंतिम उमेदवार यादीनुसार दोन हजार ८६९ प्रभागांमधून १५ हजार ९३१ उमेदवार रिंगणात आहेत. राज्यात सर्वाधिक सतराशे उमेदवार मुंबई महापालिका निवडणुकीत, तर सर्वात कमी २३० उमेदवार इचलकरंजी महापालिकेची निवडणूक लढवत आहेत. यंदाच्या निवडणुकीत अनेक उमेदवार बिनविरोध निवडून आल्याच्या मुद्यावरून राजकीय पक्षांमध्ये आरोप प्रत्यारोप सुरू आहेत.

****

भाजपचे सर्वाधिक बिनविरोध निवडून आलेले नगरसेवक म्हणजे हा भाजपचा लोकशाही गुंडाळून ठेवण्याचा कारनामा असल्याची टिका काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर हे संवैधानिक पदावर असूनही सत्ताधारी पक्षाचा प्रचार करत आहेत, त्यामुळे त्यांना निलंबित करावं अशी मागणीही त्यांनी केली.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या परीक्षा पे चर्चा या राष्ट्रीय संवादाच्या नवव्या भागात सहभागी होण्यासाठी इयत्ता ६ वी ते १२ वी पर्यंतच्या विद्यार्थी, त्यांचे पालक आणि शिक्षक पात्र आहेत. संबंधितांनी यात सहभागी होण्यासाठी माय जी ओ व्ही संकेतस्थावर नोंदणी करण्याचं आवाहन केंद्र सरकारतर्फे समाज माध्यमांवर करण्यात आलं आहे.

****

नांदेड इथलं मीमांसा फाउंडेशन, दैनिक समीक्षा, मंथन क्रिएटिव्ह ग्रुप, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ आणि पत्रकार प्रेस परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने देण्यात येणारा राज्यस्तरीय अनिल कोकीळ स्मृती पत्रकारिता पुरस्कार आकाशवाणीचे हिंगोली जिल्ह्याचे वार्ताहर रमेश कदम यांना जाहीर झाला आहे. मराठी पत्रकार संघटनेचे मराठवाडा विभागीय अध्यक्ष रुपेश पाडमुख यांनी काल नांदेड इथं ही घोषणा केली. आज या पुरस्काराचं वितरण होणार आहे.

****

तिसरी कोकण कोस्टल हाफ मॅरेथॉन काल रत्नागिरीत मोठ्या उत्साहात पार पडली. देशातल्या ३०० शहरांमधले दोन हजार २०० हून अधिक धावपटू रत्नागिरीत मराठी भाषेसाठी धावले. २१ किलोमीटरच्या स्पर्धेत अभिषेक देवकातेनं स्वतःचाच विक्रम मोडून स्पर्धा जिंकली. एक धाव मराठी भाषेसाठी, अशी या स्पर्धेची संकल्पना असल्याचं सुवर्णसूर्य फाउंडेशनचे प्रसाद देवस्थळी यांनी सांगितलं, तर एखाद्या भाषेसाठी मॅरेथॉन होते, याचं हे जगातलं पहिलं उदाहरण असल्याची भावना मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी व्यक्त केली.

****

६८व्या राष्ट्रीय नेमबाजी अजिंक्यपद स्पर्धेत भारतीय लष्कराच्या अजय कुमार यानं पुरुषांच्या दहा मीटर एअर पिस्तूल प्रकारात सुवर्णपदक जिंकलं. रेल्वेच्या शुभम बिस्ला यानं रौप्य, तर हरियाणाच्या अनमोल जैननं कांस्यपदक जिंकलं. कर्नाटकच्या जोनाथन गॅविन अँटनी यानं उत्कृष्ट कामगिरी करत उप-युवा, युवा आणि कनिष्ठ गटांमध्ये सुवर्णपदकं जिंकली.

****

दादरा नगर हवेली आणि दमण-दीवच्या समुद्रकिनाऱ्यावर आजपासून खेलो इंडिया बीच गेम्सच्या दुसऱ्या पर्वाला सुरुवात होत आहे. १० तारखेपर्यंत चालणाऱ्या या स्पर्धेत २५ राज्ये आणि सहा केंद्रशासित प्रदेशांतले १३००हून अधिक खेळाडू सहभागी होत असून, सहा क्रीडा प्रकारांचा थरार पाहायला मिळणार आहे. बीच स्पोर्ट्स संस्कृतीला चालना देत तरुणांना क्रीडाक्षेत्रात संधी देण्याचा हा महत्त्वाचा उपक्रम आहे.

****

उत्तर भारतात मोठ्या प्रमाणात थंडी आणि धुक्यामुळे पुणे रेल्वे सेवेवर परिणाम झाला आहे. दिल्लीला जाणार्या २१ रेल्वे दोन तासाहून अधिक उशिरानं धावत असल्याची माहिती रेल्वे विभागानं दिली.

****